# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

महत्तवाचे

क्रमांकः-तंशिस/शैवि/Mahadbt/2020/ 153
दिनांकः- 9 JAN 2020

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सर्व शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था ,
नागपूर विभाग. नागपूर

विषयः- MahaDBT पोर्टलवर 2019-20 मधील भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्जामध्ये मंजूर शुल्काव्यतिरीक्त विविध शिर्षाअंतर्गत अतिरीक्त शुल्क लागुन येत असल्याबाबत.

संदर्भः- काही संस्थांनी याबाबत केलेला पत्र व्यवहार.

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की, या विभागांच्या अधिपत्याखाली येत असलेल्या ब-याच संस्थांच्या अर्जामध्ये MahaDBT पोर्टलवर शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील भारत सरकार शिष्यवृत्तीच्या अर्जामध्ये मंजूर शुल्काव्यतिरीक्त विविध शिर्षाअंतर्गत Library Fee , Gymkhana Fee, Extra Curriculum/Activity Fee, Computer Trainning Fee इत्यादी प्रकारचे अतिरीक्त शुल्क लागुन येत असल्याबाबत समाज कल्याण विभागांकडुन तसेच काही संस्थांकडुन या कार्यालयास पत्र प्राप्त होत आहे.

**याआधी सर्व संस्थांना कळवुन सुध्दा MahaDBT पोर्टलवर पडताळणी केली असता वरीलप्रकारच्या अतिरीक्त शुल्क संस्थांनी टाकल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे समाज कल्याण विभागांकडुन इतर शिष्यवृत्तीचे अर्ज तसेच मा. संचालक, कार्यालयाकडून ईबीसीचे अर्ज स्थगित ठेवलेले आहे. तरी या पत्राव्दारे सर्व संस्थांना कळविण्यांत येते की. संस्थांनी त्याच्या लॉगीन वर अतिरीक्त शुल्कांची तपासणी करुन विविध शिर्षामध्ये अतिरीक्त शुल्क असल्याचे निदर्शनास आल्यास, दि. 13/01/2020 पर्यंत या कार्यालयास ronagpur@dtemaharashtra.gov.in वर ईमेल व्दारे पाठविण्यांत यावी.त्यानंतर आलेल्या पत्रांची दखल घेतली जाणार नाही, यांची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रतः-1) मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई-400001, यांना माहितीकरिता मानार्थ सादर.
2) सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग ,नागपुर, वर्धा, चंद्रपुर, यांना माहितीकरिता.